# महाराष्ट्र शासन


इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**

पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – ४४० ०२२

दूरध्वनी क्र.०७१२- २९५९३८१  CIN No. U८५३००PN२०१९NPL१८७४०५  ई-मेल: fellowshipmahajyoti@gmail.com


जावक क्र.महाज्योती/पीएचडी-२०२३/२५०४/२०२४-२५,  दि.०३.१०.२०२४

## परिपत्रक

**विषय :- महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती (MJPRF) -२०२३ योजनेअंतर्गत कागदपत्रे पडताळणीकरिता शेवटची संधी उपलब्ध करुन देणेबाबत.**

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती (MJPRF) -२०२३ योजनेअंतर्गत अर्ज केलेल्या उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी ही दि.०७.०८.२०२४ ते दि.२२.०८.२०२४ या दरम्यान पार पडलेली आहे. मात्र जे विद्यार्थी नेमून दिलेल्या दिवशी या कार्यालयात येऊन कागदपत्रे पडताळणी करु शकलेले नाहीत. अश्या विद्यार्थ्यांनी या कार्यालयाच्या कॉल सेंटर वर आमची कागदपत्रे पडताळणी करुन घ्यावी म्हणून या कार्यालयाकडे विनंती केलेली होती. विद्यार्थ्यांच्या विनंतीनुसार दि.०९.०९.२०२४ पर्यंत कागदपत्रे पडताळणी करिता मुदतवाढ देण्यात आलेली होती. परंतु अजुनही विद्यार्थ्यांचे कागदपत्रे तपासणी संबधीत महाज्योतीच्या कॉल सेंटरवर विनंती करत आहेत. त्याकरिता विद्यार्थ्यांना कागदपत्रे पडताळणीकरिता मुदतवाढ देण्यात येत आहे.

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती (MJPRF) -२०२३ योजनेअंतर्गत अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये या करिता कागदपत्रे पडताळणीसाठी शेवटची संधी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय महाज्योती प्रशासनाने घेतलेला आहे.

ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप कागदपत्रे पडताळणी केलेली नाही त्यांना शेवटची संधी देण्यात येत आहे, या नंतर कोणतीही संधी देण्यात येणार नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. तसेच या आधी कागदपत्रे पडताळणी करिता देण्यात आलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करुन **महाज्योती कार्यालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर - ४४० ०२२** या पत्त्यावर मूळ कागदपत्रांसहीत दि.०७.१०.२०२४ पर्यंत सकाळी ११.०० ते ०५.०० या दरम्यान कागदपत्रे पडताळणी करिता उपस्थित रहावे.

**-स्वा-**

**(राजेश खवले)**

**व्यवस्थापकीय संचालक**

**महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था**

**(महाज्योती),महाराष्ट्र राज्य, नागपुर**